पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १६६**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ११/०३/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार दि.११/०३/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे राहुल तानाजी
६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७. मा.कदम शशिकांत गणपत
८. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
९. मा.संतोष बबन कांबळे
१०. मा.अभिषेक गोविंद बारणे
११. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२. मा.फुगे भिमाबाई पोपट
१३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१४. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील – अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखाधिकारी, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.तुपे, मा.निकम, मा.भालकर – सह शहर अभियंता, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.अलमलेकर, मा.जोशी, मा.खांडेकर, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.बहुरे – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – प्र.मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.केंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण), मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.गलबले, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.पुजारी, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.सेठिया, मा.राणे, मा.वाघुंडे, मा.पोरेड्डी, मा.काळे -

कार्यकारी अभियंता, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.गाडेकर, मा.दांगट – प्रशासन अधिकारी मा.गोफणे – आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.१२) शहीद परिवारास आर्थिक मदत मिळणेबाबत मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेबाबत.- मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३) मा.स्थायी समिती ठराव क्र.६८३१ दि.२८/०२/२०२० मध्ये दुरूस्ती करणेबाबत. – मा.सुवर्णा बुर्डे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१४) जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड मनपा आणि थिएटर वर्कशॉप कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य स्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.- मा.सुवर्णा बुर्डे, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१५) महेशनगर (संत तुकारामनगर) येथील व्यायामशाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत. – मा.सुलक्षणा धर, मा.अभिषेक बारणे.

विषय क्र.१६) मा.स्थायी समिती ठराव क्र.६९५३ दि.२८/०२/२०२० मध्ये दुरूस्ती करणेबाबत. – मा.संतोष कांबळे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१७) पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळेतील इ.बालवाडी ते ८ वी तील सर्व विद्यार्थी विद्यार्थींना गणवेश देणेबाबत.- मा.अंबरनाथ कांबळे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१८) पिं.चिं.मनपा माध्यमिक शाळेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थींना गणवेश देणेबाबत.- मा.अंबरनाथ कांबळे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१९) ठराव रद्द करणेबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२०) पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञानकौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत सन २०२०-२०२१ या कालावधीत वस्तीपातळीवर प्रशिक्षण योजना राबविणेबाबत.- मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२१) भूसंपादन करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.- मा.राहूल कलाटे, शितल शिंदे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक २८/०२/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६३) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०६/०३/२०२० रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६४) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ६९६३ विषय क्रमांक – १
दिनांक – ११/०३/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/१२९/२०२०, दि.०२/०३/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९६४ विषय क्रमांक – २
दिनांक – ११/०३/२०२० विभाग – फ क्षेत्रीय, स्थापत्य
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त-१ यांचे पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/११५/२०२०, दि.१०/०२/२०२०

मा.अति.आयुक्त-१ यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्राअंतर्गत विविध विकास कामे सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केलेली आहेत. सदर प्रस्तावीत विकास कामे हि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची आहेत व त्यात प्रभाग क्र.१ चिखली मधील मनपाच्या विकास योजनेतील मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून नव्याने ताब्यात आलेल्या अग्निशमन केंद्र, हॉस्पिटल इत्यादी आरक्षणे विकसित करणे या कामांचा समावेश आहे. अग्निशमन केंद्र किंवा हॉस्पिटल विकसित करणे हि कामे विस्तृत स्वरुपाची आहेत.सदरची कामे करत असताना विविध नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश त्या कामांत करणे गरजेचे आहे.तसेच सदरची कामे करणे करिता पुरेसे तांत्रिक नैपुण्य महानगरपालिकेकडील अभियंताकडे उपलब्ध असले तरी काही वेळा अपु-या कर्मचारी वर्गामुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यावरण विषयक अभ्यास तसेच खाजगी कारणातुन अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास, प्रकल्पांसाठी कायदेविषयक, अर्थविषयक अन्वेशन अशा बाबींसाठी वास्तुविशारद किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता आहे. या प्रकल्पांतर्गत विविध नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. त्याकरिता विस्तृत व परिपूर्ण संकल्पचित्रे व आराखडे तयार करणे, काम वैशिष्ठपूर्ण स्वरूपाचे असलेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मंजूर दरसूचीत समाविष्ठ नसणा-या विविध बाबींचे दरपृथःकरण तयार करून त्यास मान्यता घेणे, निविदा विषयक आवश्यक कामे करणे इ. निविदा पुर्व कामे करणेकरिता तसेच तांत्रिकदृष्टया आराखड्याप्रमाणे काम करुन घेणे, प्रकल्पाचे दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे इ. निविदापश्च्यात कामे चोखपणे होणे आवश्यक आहे .या सर्व बाबी विचारात घेऊन मनपाच्या वास्तुविशारद पॅनेलवर असलेले या क्षेत्रातील तज्ञ वास्तुविशारद यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने मा.शहर अभियंता सो. यांचे दालनात दि.१८/०६/२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांची नियुक्ती करणेकरिता आवश्यक असलेली दरपत्रके

मागविणेकरिता कोटेशन नोटीस इकडील विभागामार्फत मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.०२/०१/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आली होती. या विभागाकडून संगणक विभागाला कोटेशन नोटीस प्रसिध्द करणेकामी पाठविलेल्या इ–मेल ची प्रिंट व कोटेशन नोटीस सोबत जोडली आहेत. सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक या विभागाकडे सादर करण्याची अंतिम दिनांक ०८/०१/२०२० होती. सदर कोटेशन नोटीस च्या अनुषंगाने इकडील विभागास विविध वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची दरपत्रके प्राप्त झाली आहेत. दि.२०/०१/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्यात आली असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे.त्यातील लघुत्तम दर (जीएसटी वगळता) सादर केलेल्या वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे तर्फे त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या कामाकरिता नेमणूक करणेबाबतचा खालील प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

| अनु.क्र. | कामाचे नाव | एकक | वास्तुविशारद / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे नाव | प्राप्त दर (% ) (जी.एस.टी शिवाय) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निविदा पूर्व कामाकरिता | निविदा पश्च्यात कामाकरिता | एकूण |
| १ | प्रभाग क्र.११ मध्ये से.क्र.२० मधील प्राधिकरण हस्तांतरित मोकळ्या जागेत सांस्कृतिक केंद्र बांधणे. | % प्रती काम | मे.निओजन कन्सलटट | ०.७० | १.२८ | १.९८ |
| २ | प्रभाग क्र.१ चिखली मधील आरक्षण क्र.१/८८ अ मनपा उपयोग येथे अग्निशमन केंद्र विकसित करणे. | % प्रती काम | मे.निओजन कन्सलटट | ०.७० | १.२८ | १.९८ |
| ३ | प्रभाग क्र.१ चिखली मधील आरक्षण क्र.१/८८ अ मनपा उपयोग येथे हॉस्पिटल विकसित करणे. | % प्रती काम | मे.अर्थस्केप आर्किटेक्ट अँड कंसल्टंट | १.२५ | ०.७५ | २.०० |
| ४ | प्रभाग क्र.१३ येथील धर्मवीर संभाजी राजे क्रीडासंकुल विकसित करणे. | % प्रती काम | मे.सचिन आपटे असोसिएट | ०.८० | १.१९ | १.९९ |
| ५ | प्रभाग क्र.१ चिखली येथील आरक्षण क्र.१/९६ मध्ये टाऊन हॉल विकसित करणे (टप्पा -२) | % प्रती काम | मे.अर्थस्केप आर्किटेक्ट अँड कंसल्टंट | निरंक | १.२५ | १.२५ |
| ६ | प्रभाग क्र.११ मधील पूर्णानगर परिसरातील राघवेंद्र हॉटेल ते नक्षत्र फेज १ पर्यंत रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे. | % प्रती काम | मे.मप्स ग्लोबल सिविलटेक प्रा.ली. | ०.९५ | १.०० | १.९५ |
| ७ | प्रभाग क्र.११ मधील से.क्र.२० येथील कृष्णानगर मुख्य रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे. | % प्रती काम | मे.मप्स ग्लोबल सिविलटेक प्रा.ली | ०.९५ | १.०० | १.९५ |

तरी उपरोक्त नमुद केलेल्या मनपाचे विकास कामांना त्यांचे नावासमोर दर्शविलेले वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेस तसेच त्याकामी देय असलेली फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९६५ विषय क्रमांक – ३

दिनांक – ११/०३/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१८५/२०२०, दि.०४/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात विविध पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करून डाटा एंट्री ऑपरेटर पदासाठी प्राप्त उमेदवारांची लेखीपरिक्षा घेऊन त्यामधुन गुणवत्ता व आरक्षणानुसार निवड झालेल्या उमेदवारांची निवडयादी सोबतचे पप्रत्र अ मध्ये सादर केली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९६६ विषय क्रमांक – ४

दिनांक – ११/०३/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१८६/२०२०, दि.०४/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात असलेले मंजुर असलेल्या २९ वरिष्ठ निवासी, ६३ कनिष्ठ निवासी, ५ वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, ८ वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी, ०९ वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु व २ वैद्यकिय अधिकारी बी.टी.ओ पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रकटन प्रसिध्द करून प्राप्त झालेल्या उमेदवारांमधून दंतरोग विभाग वगळता इतर उमेदवारांची गुणाणुक्रमे व आरक्षणानुसार निवड करणेत आलेली आहे. निवड झालेल्या १५ वरिष्ठ निवासी, ४१ कनिष्ठ निवासी, ५ सी.एम.ओ, ६ शिफ्ट ड्युटी, ६ आय.सी.यु व १ बी.टी.ओ असे प्रपत्र अ नुसार एकूण ७४ उमेदवारांना दिलेल्या नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९६७ विषय क्रमांक – ५

दिनांक – ११/०३/२०२० विभाग – ड क्षेत्रीय, विद्युत

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षेका/वि/कावि/३९/२०२०, दि.०४/०३/२०२०

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

'ड' कार्यक्षेत्रांतर्गत सन २०१९-२० साठी उपरोक्त खाली नमूद केलेल्या कामाला मा.महापालिका सभा समिती ठराव क्र. ४१८ दि.१५/०६/२०१९ चे अन्वये एकत्रित अंदाजपत्रका अंतर्गत प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | सल्लागाराचे नाव | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | पुनावळे येथील स.नं.५० व ५१ मधून जाणारा १८ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे या कामातील विद्युत विषयक कामे करणे. (२०१९ - २०) | मे. लिड्म कन्सलटंट प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई<br>मे.कंपास कंन्सलटंन्सी इंजिनिअरींग सर्विसेस | ०.८९%<br>०.९०% | लघुत्तम दर<br>०.८९% |
| २ | पुनावळे येथील स.नं.१, ६, ८ व १० मधून जाणारा १८ मी. डी. पी. रस्ता विकसित करणे या कामातील विद्युत विषयक कामे करणे. (२०१९ - २०) | मे. लिड्म कन्सलटंट प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई<br>मे.कंपास कंन्सलटंन्सी इंजिनिअरींग सर्विसेस | ०.८९%<br>०.९०% | लघुत्तम दर<br>०.८९% |
| ३ | पुनावळे येथील स.नं. ६, ७, ८, ९, १०, ११ ते १५ व १९ मधून जाणारा १८ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे या कामातील विद्युत विषयक कामे करणे. | मे. लिड्म कन्सलटंट प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई<br>मे.कंपास कंन्सलटंन्सी इंजिनिअरींग सर्विसेस | ०.८९%<br>०.९०% | लघुत्तम दर<br>०.८९% |
| ४ | पुनावळे येथील स. नं. ४२, ४३ मधून जाणारा जांबे गावाकडे जाणारा १८ मी. डी. पी. रस्ता विकसित करणे या कामातील विद्युत विषयक कामे करणे. | मे. लिड्म कन्सलटंट प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई<br>मे.कंपास कंन्सलटंन्सी इंजिनिअरींग सर्विसेस | ०.८९%<br>०.९०% | लघुत्तम दर<br>०.८९% |

सदरचे विद्युत विषयक कामांच्या बाबींचे पुर्वगणपत्रक तयार करणेव निविदा बनविणे सह कामाची देखरेख करणे इ. निविदापुर्व (Pre tender activity) व निविदा पश्र्चात (post tender activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता विद्युत विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची मा.आयुक्त सो. यांच्या दि.२०/०२/२०१९ रोजी प्रसिद्ध केलेल्या नामिकासुची नुसारकोटेशन नो.क्र.DZ/ELE/२१०/२०१९-२० दि.३०/०७/२०१९ अन्वये दरपत्रक मागविण्यात आलेआहेत. त्यानुसार मे.लिड्म कन्सलटंट प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांचेकडून ०.८९% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला

आहे. सदरचा दर हा मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेल्या दरापेक्षा कमी आहे. त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगती पथावर आहेत त्यांनी मनपाला आत्तापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे त्यानुसार सदरचे काम तांत्रिक दृष्ट्या करुन प्रत्यक्ष जागेवर नियोजित वेळेत अंमलबजावणी होणेचे दृष्टीने मे.लिड्म कन्सलटंट प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांची नेमणुक करुन त्याकामी लागणारी फी ही (०.८९%) प्राप्त झालेली आहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरीता एकूण अंदाजे र.रु.४,८०,०००/- (अक्षरी र.रू.चार लाख ऐंशी हजार फक्त) पर्यंत फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९६८ विषय क्रमांक – ६
दिनांक – ११/०३/२०२० विभाग – स्थानिक संस्था कर
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.स्था.सं.कर/१३/कावि/९७/२०२०, दि.०३/०३/२०२०

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

माजी अतिरिक्त आयुक्त, (सेवा निवृत्त) श्री.तानाजी साहेबराव शिंदे यांनी जयपुर कोर्टामध्ये केस नं.४/२००३ अन्वये सुनावणीसाठी जयपुर कोर्टात उपस्थीत राहुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने कामकाज पुर्ण केले असलेने माजी अतिरिक्त आयुक्त श्री.तानाजी साहेबराव शिंदे यांना पुणे ते जयपुर, जयपुर ते पुणे जाण्या येणेचे विमान प्रवासाचे तिकीट बिल व राहण्याचे हॉटेलचे बिल यांबाबतचे झालेल्या एकूण खर्चाचे बिल र.रु.१३,५९६/-(अक्षरी र.रू.तेरा हजार पाचशे शहाण्णव फक्त) इतके अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९६९ विषय क्रमांक – ७
दिनांक – ११/०३/२०२० विभाग – ड क्षेत्रिय, विद्युत
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षे/वि/०१/कावि/३७/२०२०, दि.०४/०३/२०२०

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक २५ वाकड येथील कालाखडक ते वाकड पोलिस स्टेशन २४ मी डी.पी. रस्त्याचे काम करणेचे प्रस्तावीत आहे. तुलनात्मक दर पत्रक (Comparative Statement)

| अ.क्र. | सल्लागाराचे नाव | निविदा पूर्व दर | निविदा पश्च्यात दर | एकूण प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.लिड्रम कन्सलटंट प्रायव्हेट लिमिटेड , मुंबई | ०.५०% | ०.४०% | ०.९०% | - |
| २ | मे.कंपास कंन्सलटंन्सी इंजिनिअरींग सर्विसेस | ०.५०% | ०.३९ | ०.८९% | लघुत्तम |
| ३ | मे.इन्फिनीटी कंन्सलटींग इंजिनिअर्स पुणे | ०.५०% | ०.४०% | ०.९०% | - |

सदरचे काम मनपाचे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात समाविष्ठ केलेले आहे. तसेच सदर कामाकरिता आवश्यक प्रशा.मान्यता प्रस्तावित केलेली असुन पुरेशी तरतुद वर्ग करून धेणेत आलेली आहे. सदरचे काम हे वैशिष्ट्यपुर्ण असलेने ते गुणवत्तापुर्वक, मुदतीत पुर्ण करणे गरजेचे आहे त्याकरिता तज्ञ सल्लागाराची आवश्यकता आहे. सदर कामाचे योग्य नियोजन करुन पुर्वगणन अंदाजपत्रक तयार करणे, दरसुचीमध्ये समाविष्ठ नसलेल्या बाबींचे दरपृथकरण (RA) तयार करणे, नकाशे तयार करणे, निविदा प्रक्रियेसाठी कागदपत्रांची पुर्तता करणे, इ निविदा पुर्व (Pre Tender Activity) व कामाचे आदेश मिळाल्यानंतर संपुर्ण कामाचे नियोजन व वेळोवेळी देखरेख करणे, मोजमापे तपासणे इ.निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. मे.कंपास कन्सल्टंसी इंगीनीरिंग सेर्विसिस- पुणे ४११०६१ यांचे ०.८९ टक्के हे दर सर्वात कमी असुन त्यांचे नाव मनपाचे नामिका सुची मध्ये (Empanel) मध्ये समाविष्ठ आहे. सदर कामाची सल्लागार फी.०.८९ टक्के दराने अदा करणेत येईल. अंदाजपत्रक कामातील पानांक २० अनुक्रमांक ४७ नुसार रु.र.१०,००,००,०००/- उपलब्ध आहे. सदर कामासाठी अंदाजे एकूण र.रू.१,९९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे त्याअन्वये सल्लागाराच्या ०.८९ टक्के दरा प्रमाणे सल्लागाराला एकूण अंदाजे र.रू.१,७७,११०/- इतक्या रकमेची फी अदा करणे आवश्यक राहील. नामिका सुची तयार करतांना दिलेल्या सर्व अटी व शर्ती ह्या सल्लागार संस्थेस बंधनकराक असतील. तरी प्रस्तूत कामाकरीता मे. कंपास कन्सल्टंसी इंजिनियरिंग सेर्विसिस- पुणे ४११०६१ यांची नेमणुक करणेस व ०.८९ टक्के दराने फि अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९७० | विषय क्रमांक – ८

दिनांक – ११/०३/२०२० | विभाग – नगरसचिव

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे | अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/०१/कावि/२७९/२०२०, दि.०६/०३/२०२०

मा.नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या

विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९७१ विषय क्रमांक – ९

दिनांक – ११/०३/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/०६/कावि/३१/२०२०, दि.०३/०३/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१०.०२.२०२० ते दि.१६.०२.२०२० अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/३१/२०२० दि.०३/०३/२०२० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९७२ विषय क्रमांक – १०

दिनांक – ११/०३/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/०६/कावि/३२/२०२०, दि.०३/०३/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१७.०२.२०२० ते दि.२३.०३.२०२० अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/३२/२०२० दि.०३/०३/२०२० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९७३ विषय क्रमांक – ११

दिनांक – ११/०३/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/०६/कावि/१७६/२०२०, दि.०५/०३/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.8/1/2019-20 अन्वये रावेत येथील जलउपसा केंद्र येथे पवना नदीमधील व इनटेक चॅनेलमधील गाळ व कचरा काढणेकामी मे.महाराष्ट्र अंडर वॉटर सर्व्हीसेस नि.र.रू.36,96,000/- (अक्षरी र.रु.छत्तीस लाख शहाण्णव हजार फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.36,96,000/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम

उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.36,96,000/- पेक्षा 4.1% कमी म्हणजेच र.रु.35,44,464/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.35,44,464/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ६९७४ विषय क्रमांक – १२

दिनांक – ११/०३/२०२०

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरात मोठया संख्येने सैनिक कुटूंब शिक्षण आणि रोजगाराच्या उद्येशाने स्थायिक झालेले आहेत.आज शहरात कित्येक वर्षापासून राहत असलेल्या या सैनिक परिवारातील मुले सैन्यात देशसेवा करत आहेत. जम्मू काश्मिरसह लेह-लडाख व इतर भागात अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये सीमेवर देश रक्षणासाठी तैनात आहेत. राज्यातील विविध जिल्हयातील जवान शहीद झाल्यावर केंद्र शासन तसेच राज्य सरकार व स्थानिक पातळीवर शहीद परिवारास आर्थिक मदत केली जाते. खुप मोठा नावलौकीक आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा आज राज्यात व देशात आहे. आपल्या पिंपरी चिंचवड शहरात स्थायिक असलेल्या सैनिक परिवारातील जवान देशसेवा करताना यापुढील काळात शहीद झाल्यास त्या कुटूंबाला महानगरपालिकेच्यावतीने आर्थिक मदत र.रु.५,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख फक्त) त्वरित देणेस मान्यता देणेकामी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने उपलब्ध झालेला हा निधी शहीद कुटूंबातील मुलांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी खूप मोठा हातभार लावेल आणि सैनिक परिवाराचे मनोबल निश्चितपणे उंचावले जाईल आणि जवानांच्या सर्वोच्च बलिदानाचा मान-सन्मान राखण्याचे कार्य या निमित्ताने निश्चित होईल. याबाबत धोरण ठरविणेची संपूर्ण कार्यवाही नागरवस्ती विभागाकडून करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९७५ विषय क्रमांक – १३

दिनांक – ११/०३/२०२०

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.सुवर्णा बुर्डे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्र.६८३१ दि.२८/०२/२०२० मधील संपूर्ण मजकूर वगळणेत यावा आणि त्या ऐवजी "सदर विषय मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे". या प्रमाणे मजकूर समाविष्ठ करणेची दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९७६ विषय क्रमांक – १४

दिनांक – ११/०३/२०२०

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.सुवर्णा बुर्डे, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव –

थिएटर वर्कशॉप कंपनी संस्था आणि पैस रंगमंच यांच्यावतीने ८ मार्च ते १५ मार्च २०२० दरम्यान महिला दिना निमित्त "व्यक्त अभिव्यक्ती" हा महिलांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने हा विशेष कार्यक्रम आयोजित करणेत आलेला आहे. यात कथाकथन, अभिवाचन. काव्यवाचन. नाट्य महोत्सव राज्यस्तरीय एकपात्री व लघुनाटीका स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा कालावधी ८ दिवसांचा आहे. खास महिलांसाठी असलेल्या या कार्यक्रमातुन महिलांना हक्काचे व्यासपीठ देण्याचा मानस आहे. तरी या कार्यक्रमासाठी महापालिकेने मुख्य प्रायोजक म्हणून सहयोग नोंदवावा यासाठी साधारण र.रू.८०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. मुख्य प्रायोजक म्हणून सोशल मिडीयावर जाहिरात, कार्यक्रमाचे ठिकाणी रंग मंचावर कायमस्वरूपी ६ स्टँडी, १ प्रोजेक्टर स्क्रीन अशी सोय असणार आहे शिवाय सोशल मिडियाच्या माध्यमातून अधिकाअधिक लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न असेल. राज्यस्तरीय स्पर्धोसाठी राज्यस्तरातून महिलांचा प्रतिसाद मिळत असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि थिएटर वर्कसॉप कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिना निमित्त "व्यक्त अभिव्यक्ती" या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यास व त्याकरीता येणा-या र.रू.८०,०००/- (अक्षरी र.रू.ऐंशी हजार फक्त) थिएटर वर्कशॉप कंपनी यांचे नावे अदा करण्यास व त्याकरिता येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९७७ विषय क्रमांक – १५

दिनांक – ११/०३/२०२०

सुचक – मा.सुलक्षणा धर अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.सुलक्षणा धर, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव –

महेशनगर (संत तुकारामनगर) येथील जिजाऊ सांस्कृतिक भवनमधील व्यायामशाळा जयभारत मित्र मंडळ, संत तुकाराम नगर, यांना महिलांकरिता ११ महिने कराराने दरमहा र.रू.२०००/- सेवाशुल्क देऊन चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९७८ विषय क्रमांक – १६

दिनांक – ११/०३/२०२०

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.संतोष कांबळे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्र.६९५३ दि.२८/०२/२०२० मध्ये दि.१/९/२०१९ ते ३१/७/२०२० अखेर ११ महिने कालावधीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन सार्वजनिक वाचनालय हे सोहम लायब्ररी या संस्थेस प्रति महा र.रू.१०,०००/- (अक्षरी र.रू.दहा हजार फक्त) मानधनावर चालविणेस मान्यता देणेत येत आहे हा मजकूर समाविष्ट करणेस व याप्रमाणे दुरूस्तीसह ठराव मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९७९ विषय क्रमांक – १७

दिनांक – ११/०३/२०२०

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इ.बालवाडी ते ८ वी तील सर्व विद्यार्थी विद्यार्थीनींना शालेय पटानुसार प्रति विद्यार्थी विद्यार्थीनींना दोन शालेय विद्यार्थी गणवेश श्री.महालक्ष्मी ड्रेसेस अँड टेलरिंग फर्म, वाकड यांचेकडून व प्रति विद्यार्थी विद्यार्थीनींना दोन पी.टी.गणवेश मे.प्रेस्टीज गारमेंटस अँड टेलरिंग फर्म यांचेकडून आणि प्रति विद्यार्थी विद्यार्थीनींना एक स्वेटर मे.श्री.वैष्णवी महिला कॉपोरेशन यांचेकडून (यापूर्वीच्या रंगसंगतीनुसार) सदर साहित्याबाबत विद्यार्थींची कोणतीही गैरसोय होऊ नये व सदर साहित्य शाळा सुरू होताना म्हणजेच १५ जून २०२० रोजी पुरविणे आवश्यक असलेने यापुर्वी प्रसिध्द केलेल्या निविदा अटी शर्तीनुसार नव्याने निविदा न मागवता उपरोक्त नमुद केलेल्या मागील पुरवठाधारकांकडून सदरचे साहित्य त्यास कोणत्याही प्रकारची दरवाढ न करता मागील वर्षाचे मंजूर लघुत्तम दराने तसेच

निविदा केलेला करारनाम्यातील नमूद मुदतीनुसार व पुरवठा आदेशातील अटी शर्ती नुसार सन २०२०-२०२१ सालासाठी व पुढील कालावधीसाठी यापुर्वीच्या केलेल्या करारनाम्यानुसार पुरवठा आदेश देऊन खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच विद्यार्थी गणवेश हा खर्च प्राथमिक शिक्षण विभागाकडील विद्यार्थी गणवेश व बालवाडी विद्यार्थी गणवेश या लेखाशिर्षातून तसेच पी.टी.गणेवेश हा खर्च पी.टी.गणवेश व खेळ शाळा गणवेश या लेखाशिर्षातून तसेच स्वेटर खरेदी हा खर्च स्वेटर खरेदी व बालवाडी विद्यार्थी स्वेटर्स या लेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच, प्रस्तुत विषया संदर्भात पालिकेचे अर्थिक नुकसान होणार नाही तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही अशा रितीने कायदेशीर बाबी तपासून प्रशासनाने निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे. याकामी महानगरपालिका सभेने ७२(अ) व ७२ (ब) ची मान्यता असल्याने सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९८०　　　　　　　　विषय क्रमांक – १८

दिनांक – ११/०३/२०२०

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे　　　　　　　　अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

